# vriddhionline.com ऑनलाईन ॲडमिशन अर्ज व मेरीट अर्ज कसा भरावा(सुचना).

१) मोबाईलचा वापर ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता करु नये. डेस्कटॉप किंवा लॅपटॉपचा वापर करुनच vriddhionline.com या साईटवर व्हिजीट करा.(साईटवर जाण्याकरीता गुगल सर्च इंजीनचा वापर करु नका).

२) ज्या कॉलेजमध्ये मेरीट प्रमाणे प्रवेश पद्धत अवलंबलेली आहे त्या कॉलेजचा प्रथम मेरीट अर्ज भरावा व तो महाविद्यालयात सर्व कागदपत्रांसह जमा करावा अन्यथा आपले नाव मेरीट(गुणवत्ता)यादी करीता विचारात घेतले जाणार नाही.

३) vriddhionline.com साईटवर तुम्हाला CLICK here to select your college अशी लींक दिसेल त्यावर क्लिक करा.

४) समोर दिसणाऱ्या कॉलेजच्या यादी मधुन तुम्हाला ज्या कॉलेजचा मेरीट किंवा प्रवेश अर्ज भरायचा आहे त्या संबंधीत कॉलेजच्या नावाखाली असलेल्या "Click to visit online Admission Portal" ह्या लिंक वर क्लीक करा.

५) क्लीक केल्यावर तुम्ही निवडलेल्या कॉलेजची वेबसाईट समोर दिसेल. त्यावरील login मेनुवर क्लीक करा व आपण पहिल्यांदाच फॉर्म भरत असल्यास त्यातील Register मेनु क्लीक करुन विद्यार्थ्याने प्रथम आपले रजिस्ट्रेशन करावे.

६) स्टुडंट रजिस्ट्रेशन करित असतांना तुमच्या मोबाईल नंबर वर OTP पाठवला जाईल. हा OTP टाईम–आऊट होण्या आधी स्क्रीनवर टाकुन तुमचा मोबाईल नंबर व्हेरीफाय करा.

७) तुम्हाला तुमचा दहा आकडी युजर आयडी/ रजिस्ट्रेशन आयडी व पासवर्ड तुमच्या मोबाईलवर प्राप्त होईल. हि माहीती लिहुन ठेवावी. ऑनलाईन युजर आयडी विद्यार्थ्याला कायम वापरावा लागणार आहे.

८) दहा डिजीटचा एकच युजर आयडी / रजिस्ट्रेशन आयडीचा वापर करुन विद्यार्थी अनेक कॉलेजचा फॉर्म भरु शकतो.

९) एकाच विद्यार्थ्याला vriddhionline.com वर उपलब्ध असलेल्या प्रत्येक नविन कॉलेज मध्ये अर्ज करतांना नव्याने रजीस्ट्रेशन करण्याची गरज नाही.

१०) OTP मिळाला नाही किंवा रजिस्ट्रेशन झाले पण पासवर्ड मिळाला नाही तर तुम्ही निवडलेल्या कॉलेजमध्ये संपर्क करा. कॉलेज प्रशासनाला तुमचा मोबाईल नंबर टाकुन तुमचा रजिस्ट्रेशन आयडी व पासवर्ड तुम्हाला सांगण्याची सोय कॉलेजमधील स्टाफला दिलेली आहे.

११) कॉलेजमध्ये मेरीट अर्ज जमा केल्यावर कॉलेज प्रशासनाकडुन मेरीट यादि प्रसीद्ध केली जाईल. मेरीट यादित आपले नाव असल्यास आपण संबंधीत कॉलेजच्या लिंक वर जाऊन लॉगईन करुन त्या कॉलेजचा ऑनलाईन प्रवेश अर्ज भरावा. अर्ज भरतांना स्वतःचा फोटो व सहीची स्कॅन कॉपी किलो बाईट साईज असलेल्या जेपीजी पाईल स्वरुपात तयार ठेवावी.

१२) अर्जाची प्रिंट काढून त्यासोबत आपले सर्व आवश्यक कागदपत्र जोडुन कॉलेजमध्ये प्रवेश अर्ज स्वीकारणाऱ्या समितीकडुन आपला फॉर्म approve करुन घ्यावा.

१३) तुमचा प्रवेश अर्ज कॉलेजच्या प्रवेश समितीने approve केला असेल तरच तुम्हाला ऑनलाईन पेमेंट गेटवे वापरुन स्वतःच्या लॉगईन वरुन ऑनलाईन फि भरता किंवा ऑनलाईन चलान प्रिंट काढुन बँकेत पैसे भरता येतील.

१४) विद्यार्थ्याने ऑनलाईन फि भरावी किंवा चलान सिस्टम कॉलेज मध्ये लागु असल्यास चलान प्रमाणे प्रत्यक्ष बँकेत जाऊन पैसे भरावे व फि ची रक्कम भरल्यावर बँकतुन मिळणाऱ्या चलानची एक प्रत किंवा ऑनलाईन पेमेंट गेटवेमधुन मिळणाऱ्या रिसीटची प्रिंट काढुन प्रवेश अर्जा सोबत जोडुन कॉलेज मध्ये जमा करावी.

१५) ज्या महाविद्यालयात बँक चलान वापरुन बँकेत फि भरण्याची पद्धत नसेल किंवा ज्या कॉलेजने ऑनलाईन प्रवेश फि भरण्याची सोय उपलब्ध करुन घेतलेली नसेल, अशा महाविद्यालयात प्रवेश निश्चीत करण्याकरीता विद्यार्थ्यांने ऑनलाईन प्रवेश अर्जाची प्रिंट कागद पत्रांसह कॉलेजमध्ये जमा करुन, कॉलेजमध्ये सर्व फि रोख स्वरुपात भरुन प्रवेश पावती घेऊन प्रवेश निश्चीत करुन घ्यावा.

१६) प्रवेश अर्ज भरतांना विद्यार्थ्यास त्याचे अपेक्षीत असलेले विषय ऑनलाईन दिसत नसेतील तर कॉलेज प्रशासनाशी संपर्क साधावा.

वृद्धी सॉप्टवेअर मधुन मिळणारे सर्व रिपोर्ट, चलान, पावत्या, फॉर्मस इतर सर्व प्रिंट–आऊट हे वृद्धी सॉफ्टवेअर सोल्युशन्स प्रा. ली. व श्री. उपेंद्र लाड यांचे कॉपीराईटेड व प्रोटेक्टेड डॉक्युमेंटन्स आहेत. तसेच कॉपीराईट कायद्या अंतर्गत सॉफ्टवेअरमधील सर्व मेनु व सॉफ्टवेअरमधील कार्यपद्धती १९९८ पासुन श्री. उपेंद्र देवेंद्र लाड यांच्या मालकीची व पेटंटेड आहे. कोणतीही पुर्व परवानगी न घेता सदरील सॉफ्टवेअरची, प्रोसेस पद्धतीची, आऊट–पुटची व सॉफ्टवेअरच्या इतर कोणत्याही भागाची कोणत्याही व्यक्ती/कंपनी अथवा समुहाने कॉपी केल्यास सदरील व्यक्ती/कंपनी अथवा समुह कायदेशीर कार्यवाहीस पात्र ठरेल (मालेगाव न्यायालयाच्या कक्षेत)

भेट द्या www.vriddhisoftware.com

आपल्या मित्र/मैत्रीणीच्या माहिती करीता शेअर करा–– >